माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००००८३**

**अपिलार्थी श्री. प्रकाश पाटेकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (F/N Ward)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता एफ-उत्तर**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०५.२०२५ | ०२.०६.२०२५ | २२.०७.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०१.२०२६ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०६.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १३.०५.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *Sanjay Gandhi Nagar CHS Ltd." & "Shree Ganesh Nagar CHS Ltd." on Plot bearing CTS No. २१/५ & २१/६ of Village Sewree Wadala (South) Estate, Lokmanya Tilak Road, Wadala, Mumbai-४०००३१ या ठिकाणी बनलेल्या इमारती विषयी. (स्लम आणि सेल बिल्डींग). "Vishnuchandra Sky" File No. SRA/ENG/२४२०/FN/ML/AP*

*वरील ठिकाणी बनलेल्या इमारतीच्या फाईलचे निरीक्षण करुन Annexure १ & २, IOA, LOI, C.C., OCC Copy, OCC Plan, Final Fire NOC, Final Airport Authority of India NOC, If Any Other Amended Plan & Other Related Documents ची संपूर्ण माहिती सी.डी. स्वरुपात देण्यात द्यावी.*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०६.२०२५ रोजी शासकीय शुल्काचा भरणा करुन कार्यालयीन वेळेत माहिती प्राप्त करावी असे अपिलार्थींना कळविले. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२२.०७.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०८.१०.२०२६ आयोगास सादर करुन नमुद केले की, मातोश्री सदन सहकारी गृहनिर्माण संस्था या झो.पु. योजनेच्या कामकाजाकरीता CBI दिल्ली येथे हजर रहावयाचे आहे. त्यामुळे उपरोक्त सुनावणीस हजर राहणे शक्य होणार नाही. सदरबाबत आम्ही हजर न रहात असलेमुळे क्षमस्व आहे.

५. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २५.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

Pradeep Vyas
14-10-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२६**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ